Re9/15

# राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग
# महाराष्ट्र शासन

रागांवितंआ/फा.-२०२१/सेवाज्येष्ठता/प्र.क्र.११७/928
सामान्य प्रशासन विभाग
३ रा मजला, ॲपीजे हाउस,
दिनशॉ वाच्छा रोड,
के.सी. कॉलेज जवळ, मुंबई-४०० ०२०.
दूरध्वनी -०२२२२०२४७११
ई-मेल- rgstcmaha@rediffmail.com
दिनांक: 17 MAR 2023

ज्ञापन :-

विषय :- कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी यांची दिनांक ०१.०१.२०२३ रोजीची तात्पुरती सेवा ज्येष्ठतासूची

संदर्भ :-१. महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली १९८२ दि. २१ जून,१९८२
२. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्रमांक एसआरव्ही - २०११/प्र.क्र.२८४/१२,दिनांक २१.१०.२०११
३. सुधारीत महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली २०२१, दिनांक २१ जून,२०२१

राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाच्या कार्यालयातील कार्यरत कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी यांची दिनांक ०१.०१.२०२३ रोजीची तात्पुरती सेवा ज्येष्ठतासूची तयार करण्यात आली आहे. सदर ज्येष्ठतासूची महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली १९८२ व सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्रमांक एसआरव्ही -२०११/प्र.क्र.२८४/१२,दिनांक २१.१०.२०११ मधील सूचनांनुसार तयार करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे ज्येष्ठतासूची संबंधीत निर्गमित केलेले यापुर्वीचे सर्व आदेश किंवा अभिलेख अधिक्रमित करून सुधारीत महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली २०२१, दिनांक २१ जून,२०२१ पासून अंमलात आणली असल्याने त्यानुसार या प्रारूप ज्येष्ठतासूच्या तयार करण्यात आल्या आहेत.

सोबत जोडलेली दि. ०१.०१.२०२३ रोजीची तात्पुरती सेवा ज्येष्ठतासूची आपल्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे. त्यासंबधी आपले काही आक्षेप असल्यास किंवा ज्येष्ठतासूचीत वास्तविक त्रूटी असल्यास त्या ज्येष्ठतासूची प्राप्त झाल्यापासून १५ दिवसात आस्थापना शाखेच्या निदर्शनास आणाव्यात. विहित कालावधीत आपणाकडून निवेदने अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास ज्येष्ठतासूचीतील तपशिल अचूक आहे असे समजण्यात येईल व ज्येष्ठतासूची अंतिम करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

आदेशानुसार,

(प्रोफे. नरेंद्र शहा)
सदस्य सचिव

<u>परिशिष्ट तीन</u>

<u>ज्येष्ठता सूची प्रसिध्द करण्याचा विहित नमूना (नियम ५)</u>

१. संवर्गाचे नाव :- कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी

२. वेतनश्रेणी :- एस -२०, ५६१००-१७७५००

३. दि. १/१/२०२३ रोजीची प्रारूप / तात्पुरती ज्येष्ठतासूची (दिनांक १/१/२०२२ ते दिनांक ३१/१२/२०२२ या कालावधीत कार्यरत अधिकारी)

| अ.क्र. (१) | नियम ३ (२) (ब) नुसार ज्येष्ठता क्रमांक (२) | नांव (३) | प्रवर्ग (नियुक्तीनंतर प्रवर्ग बदलला असल्यास त्याचा दिनांक) (४) | जन्मतारीख (५) | नियुक्ती दिनांक (६) | $नियुक्तीची मार्ग (सरळसेवेने / मर्यादीत विभागीय परीक्षेद्वारे नियुक्त उमेदवारांचा गुणवत्ता क्रमांक व परीक्षेचे वर्ष ) (७) | ज्येष्ठता दिनांक / ज्येष्ठतेचा मानीव दिनांक/नियम ३ (२) (अ) नुसार संवर्गात प्रत्यक्ष रुजू दिनांक (८) | सेवानिवृत्तीचा दिनांक (९) | अभिप्राय (१०). |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १ | श्री. न. ना. पटेल | खुला | ०१-०४-१९८६ | २७-४-२०१८ | सरळ सेवा | २-५-२०१८ | ३१-०३-२०४४ | |
| २ | २ | श्री. दि.भा. जगताप | अ.जा. | २१-०३-१९८५ | २७-४-२०१८ | सरळ सेवा | ४-५-२०१८ | ३१-०३-२०४३ | |

*(टप्पा १ व २ नुसार वेगवेगळया असल्याने जे लागू असेल ते नमूद करावे.

# (१) सेवेत खुल्या प्रवर्गातून नियुक्ती झाली असून काही कालावधीनंतर मागास प्रवर्गाचा दावा सादर केला आहे व त्या प्रवर्गाचे वैध प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे.

(२) सेवेत सर्वसाधारण (non-handicapped) घटकातून नियुक्ती झाली असेल व काही कालावधीनंतर अपंगत्वाचे वैध प्रमाणपत्र सादर केले असेल तर वरील (१) व (२) येथील प्रकरणी ज्या दिनांकास मागास प्रवर्गाचा दावा /अपंगत्वाचे वैध प्रमाणपत्र सादर केले असेल तो दिनांक नमूद करावा.

$ पदोन्नत / सरळसेवा / मर्यादीत विभागीय परीक्षा इ. (यापेक्षा वेगळया मार्गाने नियुक्ती झाली असल्यास त्याबाबत नूमद करावे.)